# मान्सून-२०११ पूर्व तयारी

## जिल्हाधिकारी कार्यालय * बचत भवन * यवतमाळ येथे दिनांक ०६ जून,२०११ रोजी मान्सूनपूर्व तयारी/ आपत्ती व्यवस्थापन बाबत आयोजीत केलेल्या सभेचे इतिवृत्त

---

दिनांक ०६ जून, २०११ रोजी सायंकाळी ६.०० वाजता ***बचत भवन*** जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे **मान्सूनपूर्व तयारी बाबत मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आढावा सभा** घेण्यांत आली. सदर आयोजीत सभेस खालील कार्यालय प्रमुख व प्रतिनिधी हजर होते.

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ
२. जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ
३. अधिक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, यवतमाळ
४. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, यवतमाळ
५. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ
६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.यवतमाळ
८. जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन, यवतमाळ
९. अधिक्षक अभियंता, म.रा.वि.मंडळ,यवतमाळ
१०. कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कं., यवतमाळ
११. महाप्रबंधक, भारत संचार निगम लि. यवतमाळ,
१२. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, यवतमाळ
१३. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जि.का.यवतमाळ
१४. जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.का. यवतमाळ
१५. जिल्हा समादेशक, होमगार्ड, यवतमाळ
१६. जिल्हा कृषी अधिक्षक, यवतमाळ.
१७. जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ.
१८. जिल्हा पशुसवर्धन अधिकारी, यवतमाळ
१९. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जि.प., यवतमाळ
२०. उपविभागीय अधिकारी-----------------( सर्व )
२१. तहसिलदार, --------------------------( सर्व )

सर्वप्रथम श्री.पी.एस.बोरगांवकर,निवासी उपजिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी मान्सूनपूर्व तयारी बाबत सभेत उपस्थितांचे स्वागत करुन मा.जिल्हाधिकारी आणि सर्व उपस्थितांचे ओळख करुन देण्यात आली. त्यानंतर मा.श्री.श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यवतमाळ यांनी मान्सूनपूर्व-२०११ तयारी बाबत करावयाच्या कार्यवाही संबंधि सविस्तर चर्चा करुन खालील प्रमाणे सुचना दिल्यात.

- मा.जिल्हाधिकारी यांनी सर्वप्रथम, मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांनी सुरवात केलेल्या **एस.एम.एस.(SMS) प्रणाली बाबत माहिती** देवुन धरणातील पाणी सोडणेबाबत सुरु असलेल्या एस.एम.एस.(SMS) प्रणाली बाबत अद्यावत नंबर वर एस.एम.एस.(SMS) प्रणालीद्वारे माहिती देण्याबाबत कार्यवाही करण्याबाबत सुचीत केले.

  मान्सूनची सुरवात होणार असुन मान्सून पूर्व तयारीचे अनुषंगाने **दैनीक पर्जन्यमान (रेनफॉल) बाबत माहिती,** यावर्षी मान्सून ९८ % होण्याची अपेक्षा असून त्याअनुषंगाने धरणात पाणीसाठा करणे, जादा पाणी (Exess Rainfall) अतिवृष्टी झाल्यास सतर्कतेचा इशारा देणे वा धरणाचे पाणी सोडण्यापूर्वी सतर्कतेचा इशारा देण्याबाबत कळविले.

  त्यानंतर आपत्तीबाबत कळवितांना **जापानचे पार्श्वभूमी बधीतली असता आपत्ती फक्त एकच येत नाही तर दोन-तिन पेक्षा जास्त आपत्ती एकत्रसुध्दा येवु शकतात** त्यामुळे आपण आपत्ती रोखू शकत नाही परंतू आपत्तीची तिव्रता पुर्व नियोजन करुन वा आपत्ती व्यवस्थापन करुन कमी करु शकतो. त्यानुसार मान्सून पूर्व तयारीच अनुषंगाने यवतमाळ जिल्हयात पूर परिस्थिती व विज पडून होणारी हानी गृहीत धरुन पूर्व तयारी करण्याबाबत सुचविले.

यवतमाळ जिल्हयात **पुस, अरुणावती, बेंबळा हे मोठे धरण व अपर वर्धा** धरणाचे साडंवा (Discharge) तसेच पैनगंगा, वर्धा, अरुणावती, बेंबळा, निर्गुडा, अडाण, चक्रावती, धावंडा, खुणी, व पुस हया अशा प्रामुख्याने **दहा मोठया नद्या** आहेत. या शिवाय (१) रामगंगा (२) कमळवेली (३) पाटन (४) डेहनी (५) जवळा (६) मनपूर (७) महागांव (८) लोणी (९) चिकणी असे एकुण **नऊ लहान नद्या व नाले,** असून पावसाचे अतिवृष्टी व ढगफुटीमुळे बऱ्याच नद्या नाल्यांना पूर येऊन नदीकाठचे गावांना पुराचा तडाखा बसतो.

**वीज पडून सन २०१०-११ मध्ये मोठया प्रमाणात जिवीत हाणी** झाली सदर जिवीत हानी इ. बाबत जनजागृती (अवेरनेस) व प्रबोधन करुन बऱ्यांच प्रमाणात कमी करता येते. वीज पडतांना कुठे थांबावे. कुठे थांबु नये, वीज पडतांना काय करावे काय करु नये याबाबत जनजागृती (अवेरनेस) व प्रबोधन करुन वीजेमुळे होणारे नुकसान कमी करण्याबाबत सुचना दिल्या.

**वीज अटकाव यंत्रणा (LIGHTING ARRESTER)** जिल्हयात राळेगांव व पूसद तालुक्यात दोन ठिकाणी वीज अटकाव यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली असून वणी व घाटंजी येथे वीज अटकाव यंत्रणा कार्यान्वीत करण्यात येणार आहे. सदर विज अटकाव यंत्रणा कार्यान्वीत आहे किंवा कसे या बाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, (विद्युत), उपविभागीय अधिकारी (महसूल) व तहसिलदार यांनी तपासणी करण्याबाबत सूचीत केले. तसेच पाणी पुरवठा योजनेअंतर्गत गावातील पाणी पुरवठा टाकीवर वीज अटकाव यंत्रणा (Lighting Conductor) बसवण्याबाबत सांगीतले. वीज अटकाव यंत्रणा (Lighting Conductor) बसविल्यामुळे वीज त्यामुळे आकर्षीत केल्याजाते व वीजेचा प्रार्दुभाव कमी होवून जिवीत हानी कमी होवू शकते, त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

- **मान्सून पूर्व तयारीचे अनुषंगाने अत्यावश्यक उपाययोजना :-**

  **प्रकल्प दुरुस्तीची** कामाबाबत विचारणा केली असता पांटबंधारे व जलसंपदा विभागाची प्रकल्प दुरुस्तीची कामे पूर्ण झाली असल्याचे, सांगण्यात आले. तसचे प्रकल्प, कालवे फुटणे याबाबत उपाययोजना करण्याबाबत जिल्हा परिषद यांना, छोटे सिंचन तलाव बाबत स्थानीक स्तर यांना सूचना देण्यात आल्यात. अतिवृष्टीमुळे पाणी साठयाचे धरण फुटल्यास येणारे पुर याकामी तपासणी करिता नियंत्रण अधिकारी नियुक्ती करणे. सिंचन व पाझर तलाव यांचेवर नियंत्रण अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन नियंत्रण अधिकाऱ्यांचे दूरध्वनी अद्यावत नंबर सादर करण्याबाबत सूचीत केले.

- **एस.ओ.पी. (SOP) आराखडा :-** अद्यावत करुन ३ दिवसाचे आत सादर करण्याबाबत सर्व विभाग प्रमुखांना सुचना देण्यात आल्या. नैसर्गिक आपत्ती, संभाव्य पुर-परिस्थिती बाबत शोध व बचाव पथकांचे प्रशिक्षण घेण्याबाबत सुचीत करण्यात आले. गावस्तरावर, तालुका स्तरावर समित्यांचे प्रशिक्षण व अद्यावती करणकरण्याबाबत सर्व विभाग प्रमुखांना सुचीत करण्यात आले. होमगार्ड चे अधिकारी यांना त्यांचे तालूका स्तरावरील समित्यांना प्रशिक्षण घेण्याबाबत सुचित करण्यात आले.

- **बोट** :- जिल्हास्तरावर उपलब्ध एफ.आर.पी.बोट-१ व रबर इनफॉबेल बोट-२ प्राप्त झालेल्या असुन सदर बोटी गोखी प्रकल्प, ता.दारव्हा येथे कार्यकारी अभिंयता,पाटबंधारे विभाग, यवतमाळ यांचेकडे आवश्यकते नुसार उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. सदर बोटी व उपलब्ध रोप (दोरी) चांगले आहे काय यांची तपासणी करण्याबाबत सुचीत केले. तसेच सन २००६ मध्ये तालुका वणी व उमरखेड येथे मोठयाप्रमाणात पुर परिस्थिती निर्माण झाली होती. तश्या प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यास सदर बोट तेथे पोहचवता येवू शकते काय ? यांचा विचार करुन बोट कोठे ठेवावी याबाबत विचार करुन तालुक्याची पूरपरिस्थिती लक्षात घेवून बोट उपलब्ध करुन ठेवणेबाबत सूचीत केले.

- प्रकल्पावर पाण्याचे साडंवा बाबत सुचना देण्याबाबत एस.एम.एस. (SMS) सूचना प्राप्त झाल्यावर काय करावे तसेच पाण्याचे साडंवा व एस.एम.एस. (SMS) प्रणालीबाबत प्रशिक्षण आयोजन करण्याबाबत पाटंबधारे विभागास सूचना देण्यात आल्या. सदर प्रशिक्षणामध्ये पाण्याची पातळी वाढल्यास, धरणाचा/ प्रकल्पाचा एक दरवाजा उघडला तर किती गावे बांधित होतील. ? तसेच दोन-तिन किंवा त्यापेक्षा जास्त दरवाजे उघडले तर किती गावे बांधित होतील ?

नदी काठावरील गावांस पाणी पोहचण्यांस किती वेळ लागेल ? नुकसान किती होईल ? स्थानांतरण किती गावांचे करावे लागेल ? स्थानातंरण करण्याची व्यवस्था ? इ. महत्वपूर्ण सुचना तसेच याबाबत प्रशिक्षण आयोजन करण्याबाबत सूचीत केले.

- **मा.श्री.इंद्रसेन तिटकारे, अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ** यांनी धरणाचे/ प्रकल्पाच्या पाणी साठयाबाबत नियोजन करण्याबाबत कळवून नदीमुळे बाधीत होणाऱ्या गावांची माहिती करुन ठेवण्याबाबत कळविले तसेच पाणी सोडण्याबाबत पाटंबधारे तसेच सर्व धरण/ प्रकल्प/ कालवे याचेवर लक्ष देण्याबाबत नोडल ऑफीसर, नेमणूक करण्याबाबत सूचना दिल्यात.

- मा.जिल्हाधिकारी यांनी जिल्हा व्यवस्थापन समितीचे नियंत्रण कक्षास **नोडल ऑफीसरची नेमणुक करण्याबाबत पाटबंधारे मंडळास** सूचना देवून सदर नेमणुक करण्यात आलेल्या नोडल ऑफीसर यांनी दैंनदिन पाणी, पर्जन्यमान व पाणी साठयाबाबतची माहिती संकलीत (Co-ordination) करुन रोज सादर करेल. नोडल ऑफीसर, पाटबंधारे मंडळास नेमणुक करण्याबाबत व समन्वय म्हणून कार्य करण्याबाबत सूचना देवून, एस.एम.एस. (SMS) प्रणालीद्वारे पूर, अतिवृष्टीचीमाहिती देण्याबाबत सूचीत केले.

- **नियंत्रण कक्ष (Control Room) :-** जिल्हाधिकारी कार्यालयात नियंत्रण कक्ष सुरु असुन तालुका स्तरावर १ जून पासून नियंत्रण कक्ष सुरु करण्यात आले असून सर्व विभाग प्रमुखांना नियंत्रण कक्ष सुरु करुन अद्यावत ठेवून जबाबदार व्यक्तीची नियुक्ती करण्याबाबत सुचीत केले. सदर नियंत्रण कक्ष २४ तास सुरु राहील यांची तपासणी करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, तहसिलदार व सर्व विभाग प्रमुखांना तपासणी करण्याबाबत सुचीत करुन सर्व दुरध्वनी क्रमांक अद्यावत सुरु ठेवण्याबाबत आदेश देण्यात आले. नियंत्रण कक्षास नियुक्त करण्यात आलेले कर्मचारी उपस्थित नसल्यास त्याचेवर प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल अशी तंबी दिली. तसेच **नैसर्गिक आपत्तीबाबत नुकसानीची माहिती वेळीच नियंत्रण कक्षास देण्याबाबत सुचीत करुन सकाळी १०.०० पर्यंत नुकसानीची माहिती देण्याबाबत कळविले.**

- **नाले सफाई :-** नाले सफाई बाबत जिल्हा परिषद, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मुख्याधिकारी यांना सुचना देवून नदी व नाल्यामधील अतिक्रमणे काढण्याबाबत सचीत केले.

- तसेच **औषध साठा, प्रथमोपचार, वैद्यकीय सेवा** अद्यावत ठेवणेबाबत सूचीत केले.

- **पाणी पूरवठा नियोजन आराखडा :-** नैसर्गिक आपत्तीमध्ये पाणी पूरवठा खंडीत झाल्यास आवश्यक उपाययोजना करणेबाबत सूचीत करुन पाणी पूरवठा तपासणी, टिसीएल (TCL) उपलब्ध आहे किंवा कसे याबाबत जिल्हा परिषद, ग्राम पंचायत यांना तपासणी करण्याबाबत सूचन दिल्या.

- **तसेच पूर परिस्थितीमध्ये सर्व संस्थेची पूर्व तयारी , कर्तव्य, प्रात्याक्षीक, तसेच Identification Place करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, तहसिलदार यांना आढावा घेवून तपासणी करण्याबाबत सूचीत केले.**

- **बिनतारी संदेश यंत्रणा (VHF) :-** बिनतारी संदेश यंत्रणा दुरुस्ती करण्याबाबत निधी मागणी किंवा तपासणी करण्याबाबत सुचना देवून पोलीस विभागास Wirless Set मा.जिल्हाधिकारी यांचे गाडीवर बसविण्याबाबत सूचीत केले.

- **तालुका स्तरावर बैठक:-** तालुका-स्तरावर तहसिलदार, तालूका कृषी अधिकारी, पाटंबधारे, तलाठी, शोध व बचाव पथक, ग्राम पंचायत (PRI) सदस्य यांची बैठक, प्रशिक्षण व प्रात्याक्षीकाचे आयोजन करुन आराखडा अद्यावतीकरण करण्याबाबत सूचीत केले.

- **बांधकाम विभाग :-** उपलब्ध असलेले साहित्य सामुग्री अद्यावती करण करण्यासंदर्भात उपलब्ध जेसीबी, क्रेन, गाडी, ट्रक, व्हेन, मॅन पावर, गॅस कटर, इलेक्ट्रीक कटर उपलब्ध मॅन पावर यांचे साहीत्य तसेच दुरध्वनी नंबर अद्यावत सादर करण्याबाबत सूचीत केले.

**रस्ते, पूल यांची माहिती :-** अतिवृष्टी, पूराचे पाण्यामुळे बाधित होणारे पूल व रस्त्याची माहिती Identification, अद्यावती करण करुन सदर पूलावर पुर्वतयारी म्हणून करुन तातडीने (Emergency) प्रशिक्षीत व्यक्ती नियुक्ती करुन पूर्वतयारी करणेबाबत कार्यकारी अभियंता, यांना सूचना देण्यात आल्या.

- **<u>पोलीस विभाग :-</u>** पोलीस विभागाचे नियंत्रण कक्ष (Control Room) अद्यावतीकरण करण्याबाबत सूचीत करुन पूर परिस्थिती तसेच मदत कार्या करिता पोलीस व होमगार्ड यांचे शोध व बचाव पथक (रेस्क्यु टिम) प्रत्येक उपविभागीय अधिकारी (पोलीस) व पोलीस निरीक्षक यांचे स्तरावर असले पाहीजे प्रत्येक टिम ८ व्यक्तीची असली पाहीजे. शोध व बचाव पथक, प्रथमोपचार, पोहणारे यांचा समावेश असला पाहीजे. सदर टिम/ पथक अद्यावत ठेवण्याबाबत आदेशीत केले. तसेच बिनतारी संदेशामार्फत मॅसेज पाठविणे, तातडीने माहिती पोहचविणे बाबत सूचीत करुन बिनतांरी संदेश यंत्रणा कार्यान्वीत करणेबाबत सुचीत केले.

- **<u>महाराष्ट्र विज महामंडळ (MACB) :-</u>** नियंत्रण कक्ष व मॅन पावर अद्यावतीकरण करणे, दुरध्वनी नंबर अद्यावत ठेवणे, रोहीत्राचे व्यवस्थापन करणे, अतिवृष्टीमुळे पोल पडल्यास रिस्टोर करणे, रोहीत्र किंवा इलेक्ट्रीकल केबल पाण्याखाली आल्यास विद्युत पुरवठा खंडीत करणे, पुरपरिस्थितीमध्ये विद्युत खंडीत होणाऱ्या गावाची तपासणी करणे व आवश्यक उपाययय़ोजना करणे. विद्युत खांब, झाडे पडल्यामुळे रस्ते बंद अथवा ट्राफीक जाम होणार नाही याचीं काळजी घेवून रस्ते खुले करण्याची कार्यवाही करणे बाबत आवश्यक सूचना दिल्या.

- **<u>भारत संचार निगम (BSNL) :-</u>** अतिवृष्टी, पूरामुळे संपर्क तुटणारी गांवे तपासणी **(Identification) करुन संपर्क तुटणार नाही यांची काळजी घेणे. जर अशी गांवे असतील तर त्या गांवातील चावडी किंवा ग्रामपंचायत किंवा शाळेमध्ये तंरग सेवा उपलब्ध करुन देणे बाबत सुचीत केले.**

- **<u>पुरवठा विभाग</u>**:- अतिवृष्टी, पूरामूळे संपर्क तुटणारी अतिसंवेदनशील / संवेदनशील गावामध्ये आवश्यक धान्य साठा उपलब्ध करणे, घरपोच योजने अंतर्गत ३ महीन्यांचा धान्य साठा साठवून ठेवण्याबाबत सूचीत केले. यावर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी धान्य साठा साठवून ठेवण्यात आला असल्याबाबत सांगीतले.

- **<u>पशुवैद्यकीय विभाग :-</u>** मान्सून पूर्व तयारी करिता लसीकरण १००% पूर्ण करणे बाबत सूचीत केले. तसेच नियोजन (Plan) दोन दिवसात सादर करण्याबाबत सुचीत केले.

- **<u>नैसर्गिक आपत्तीची माहिती सादर करणे :-</u>** नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती नियंत्रण कक्षास दुरध्वनीद्वारे कळवून अद्यावत तातडीने सादर करणे. ६० % चे वर पाऊस झ ाल्यास अतिवृष्टीचे अंदाजानुसार सर्वेक्षनाने झालेल्या नुकसानीची माहिती विनाविलंब सादर करण्याबाबत सूचीत करण्यात आले. तसेच फळ व शेती पिकांचे सर्व नुकसानीचे सर्वेक्षण तहसिलदार, तालुका कृषी अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी संयुक्तपणे कार्यवाही करणेबाबत सूचीत केले.

- **इतर सूचना :-**

**मा.आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांनी सूचीत केल्यानुसार सर्व खाते प्रमुखांनी शासकिय इमारतीच्या आवारात ज्या ठिकाणी मोकळी जागा असेल तिथे ५ फुट अंतर सोडून वृक्षारोपन करावे व तसे नियोजन (Plan) करावे. त्याप्रमाणेच वृक्षारोपन केलेले वृक्ष जगविण्याचे सुध्दा नियोजन ७ दिवसात सादर करावे. याबाबत निवासी उपजिल्हाधिकारी, गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार तसेच सर्व विभाग प्रमुखांना सुचीत केले तसेच सदर झाडांना ट्री गार्ड लावणे, पर्यावरण संतुलन करण्यासाठी नियोजन करण्याबाबत मा.जिल्हाधिकारी यांनी सूचीत केले.**

**त्याप्रमाणेच EGS मधे मजूराकडून कामे करण्याबाबत, वैरण विकास कामांच्या सूचना, सामाजिक वनीकरण, वृक्ष लागवड, निराधार योजनांतर्गत खाते उघडण्याबाबत तसेच महत्वपूर्ण सूचनांची अंमलबजावणी करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांनी दिल्या.**

यानंतर सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**

क्रमांक/कलि/आप.व्यव./कावि-                /२०११
**जिल्हाधिकारी यवतमाळ यांचे कार्यालय,**
**य व त मा ळ** दिनांक :-   -०६-२०११.

**प्रतिलिपी /-**

१. मा. प्रधान सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२, यांना माहीतीस सविनय सादर.
२. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मदत व पुनर्वसन, नविन प्रशासकिय इमारत, मुंबई यांना माहीतीस सविनय सादर.
३. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहीतीस सविनय सादर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना माहीती व योग्य कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.
५. जिल्हा पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांना माहीती व योग्य कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.
६.अधिक्षक अभियंता,पाटबंधारे मंडळ,यवतमाळ यांना माहीती व योग्य कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.
७. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, यवतमाळ यांना माहीती व योग्य कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित.
८. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, यवतमाळ
९. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, यवतमाळ
१०. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.यवतमाळ
११. जिल्हा उपआयुक्त, पशुसंवर्धन, यवतमाळ
१२. अधिक्षक अभियंता, म.रा.वि.मंडळ,यवतमाळ
१३. कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कं., यवतमाळ
१४. महाप्रबंधक, भारत संचार निगम लि. यवतमाळ,
१५. जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, यवतमाळ
१६. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जि.का.यवतमाळ
१७. जिल्हा पुरवठा अधिकारी, जि.का. यवतमाळ
१८. जिल्हा समादेशक, होमगार्ड, यवतमाळ
१९. जिल्हा कृषी अधिक्षक, यवतमाळ.
२०. जिल्हा माहिती अधिकारी, यवतमाळ.
२१. जिल्हा पशुसवर्धन अधिकारी, यवतमाळ
२२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जि.प., यवतमाळ
२३. उपविभागीय अधिाकारी, -------------------------
२४. तहसिलदार, ------------------ यांचेकडे योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२५. गट विकास अधिकारी, ------------------ यांचेकडे योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
२६. तालुका कृषी अधिकारी, ------------------ यांचेकडे योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**२७. मुख्याधिकारी, नगर परिष्द,** ------------------ यांचेकडे योग्य त्या उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**२८. भारस्थ अधिकारी / कार्यालय प्रमुख, ----------------------------------------------------------**

**------------------------------------------------------------------------------------------**

२९. ------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------- यांना माहीती तथा उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**